**CNR : MHST05000494-2016**

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४६२/२०१६**

दत्तात्रय विठोबा काजळे वगैरे ..... **वादी**

**वि.**

महाराष्ट्र सरकार वगैरे .... **प्रतिवादी**

**नि. ३६ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.७ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी क्र.७ वरचेवर आजारी असल्यामुळे वेळेत नि.५ चे अर्जास म्हणणे व कैफियत दाखल करता आली नाही व त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश झाला आहे. तो आदेश रद्द होवून त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेची परवानगी मिळावी. वादीच्या वकीलांचे निवेदन असे की, अर्ज खोटा व लबाडीचा असून तो वादीस मान्य व कबूल नाही. प्रतिवादीस दाव्याचे समन्स दि.८/०२/२०१७ रोजी रुजू झाले असून ते वकीलांमार्फत दि.१०/०२/२०१७ रोजी हजर झालेले आहेत. त्यांना वेळोवेळी संधी देऊनही वेळेत कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादीस म्हणणे देणेस सुमारे दोन वर्षे ९ महिनेचा उशिर झालेला असून उशिरामाफीचे योग्य कारण दिलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा व अर्ज मंजूर करावयाचा झालेस प्रतिवादीस जास्तीत जास्त खर्च बसविणेत यावा.

४. प्रतिवादीचा अर्ज व त्यावर वादीने दिलेले म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा स्थावर मालमत्तेतील हक्क प्रस्थापनासाठी असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.७ विरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द केल्यास व प्रतिवादीला कैफियत देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तथापि प्रतिवादीने अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही अथवा प्रतिवादी वारंवार आजारी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसविणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.७ यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश वादींना र.रु.५००/- खर्च देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.11.14 10:52:21 +0530

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. १३/११/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड